
# ख्रिस्ती धर्माचा प्रसार इ. स. 1600 ते आजपर्यन्त

सूचना: हा अभ्यास वाचण्यापूर्वी तुम्ही H4a1 व H4a2 हे ख्रिस्ती धर्माच्या प्राचीन इतिहासा विषयीचे अभ्यास वाचले पाहिजेत. मुलांना शिकवणाऱ्यांनी H4b3 हा अभ्यास वाचला पाहिजे.

## 1. ख्रिस्ती धर्माचा इतिहास शिकवण्यासाठी प्रार्थना व वचनच्या द्वारे तयारी करा

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु येशू तू जगामध्ये करीत असलेले कार्य आणि इतरांना सुवार्ता सांगण्याच्या कामात आम्ही कोणती भूमिका पार पाडली पाहिजे हे समजून घेण्यासाही मला व माझ्या लोकांना साहाय्य कर''

**20 व्या शतकातील जागतिक लोकसंख्येतील कृतिशील ख्रिस्ती लोकांची टक्केवारी**




कृतिशील ख्रिस्ती लोकांची संख्या 0% पासून 1900 सालापर्यन्त जागतिक लोकसंख्येच्या 2:4% इतकी होण्यास 18 शतकांचा कालावधी लागला, केवळ 70 वर्षाच्या काळात ही टक्केवारी 2.5% पासून 1970 मध्ये 5% एवढी झाली आणि फक्त गेल्या 30 वर्षात ती 5% पासून वाढून 11.2% इतकी झाली. 2000 साली फक्त नामधारी ख्रिस्ती किंवा ख्रिस्तीतर असणाऱ्या प्रत्येक नहु लोकांमागे एक व्यक्ति कृतिशील ख्रिस्ती आहे, इतिहासात हे प्रथमच घडले आहे.

### पवित्र शास्त्राभ्यास

पुढाऱ्यांनी सर्वसामान्य ख्रिस्ती लोकांच्या हाती सत्ता दिल्यावर सुवार्तेच्या बाबतीत काय घडले ते **प्रे.कृ.6:5-7** ह्या वचनांत पाहा (उत्तर: त्यांनी सर्वत्र सुवार्ता नेली आणि विश्वासणाऱ्यांची संख्या अधिकाधिक वाढत गेली)

सत्तेवरील सत्ताधीश ख्रिस्ती धर्माला विरोध करतात तेव्हा सर्वसाधारणपणे सुवार्तेच्या बाबतीत काय घडते, ते **प्रे. कृ. 8:1-8** ह्या वचनांत पाहा इतर लोकांच्या गटांना सुवार्ता समजावी यासाठी पवित्र आत्म्याने मंडळयांना काय करायला सांगितले ते **प्रे. कृ. 12:24 ते 13:5** ह्या वचनांत पाहा.

दुर्लक्षित लोकगटांमध्ये जाऊन कार्य करणाऱ्या सेवकांची मुख्य कामे कोणती आहेत ते **प्रे. कृ. 14:21-23** ह्या वचनात पाहा.

- ते कशा विषयी बोलत? (वचन 21)
- ते कोणत्या ठिकाणी गेले?
- ते ख्रिस्तावर नव्याने विश्वास ठेवणाऱ्यांसाठी काय करीत? (22)
- नवीन ख्रिस्ती लोकांसाठी कशा प्रकारच्या ख्रिस्ती लोकांची गरज असते? (23)
- मिशनरीज गेल्यावर नव्या मंडळयांचे पुढारीपण कोण करणार?

## वर्ष इ. स. 1600-1900

युरोपमधील धार्मिक व सांस्कृतिक सुधारणेने ख्रिस्ती लोकांना पवित्र शास्त्र मिळवून वाचण्याची परवानगी दिली, याचे अनेक परिणाम झाले

- हजारो युरोपियन लोकांना येशूमधील खफ्रयाखुऱ्या विश्वासाचा शोध लागला आणि मंडळीच्या अनेक रूढी परंपरांपासून सुटका झाली.
- उत्तरेकडील युरोपियन लोकांनी रोम व पोपच्या विरोधात बंड केले, मठ नष्ट केले आणि प्रॉटेस्टट धर्मसुध ारणेची चळवळ सुरु केली.
- जर्मनी व इंग्लंड मधील प्रॉटेस्टट लोकांनी जगभरातील किनाऱ्यांवरील अनेक प्रदेशांत मिशनरी पाठवले.
- कॅथॉलिक सैन्याने दक्षिण अमेरिकेवर ताबा मिळवल्यावर अनेक प्रॉटेस्टट लोक उत्तर अमेरिकेत स्थायिक झाले, तिथे त्यांनी/ निरनिराळे पंथ सुरु केले.
- तथापि, बहुसंख्य युरोपियन लोकांमधील ख्रिस्ती विश्वासाची जागा हळू हळू बुद्धिप्रामाण्यवादाने (मनुष्याच्या बुद्धीवर अवलंबून राहणे) घेतली.

## मार्टीन लूथर

कॅथॉलिक मठवासी लूथरने नव्या कराराचा अभ्यास करण्यास सुरुवात केली आणि देव लोकांचे तारण फक्त त्यांच्या विश्वासाने करतो हे त्याला समजले 1517 साली त्याने नाईण्टी फाईव्ह थिसिथ प्रकाशित केला. त्यामध्ये त्याने युरोपियन ख्रिस्ती लोकांना त्यांच्या विश्वासाचा आधार शोधण्यासाठी आणि त्यातील रीतीरिवाज पाळण्यासाठी पवित्र शाश्त्राकडे वळण्याचे आव्हान केले होते. कॅथॉलिकक पोपने त्याच्यावर बहिष्कार घातल्यावर त्याला भूमिगत व्हावे लागले होते, पवित्र शास्त्रातील लूथरच्या कल्पनांचा युरोपमध्ये मोठा प्रभाव पडला आणि त्यामुळेच प्रॅटेस्टट धर्मसुधारणेला मोठे बळ मिळाले. आज, अनेक प्रॉटेस्टंट संप्रदायांनी पुन्हा पवित्र शास्त्राकडे वळावे यासाठी आणखी एका धर्मसुधारणेची गरज आहे.

## 20 वे शतक

युरोपियन लोकांच्या अधिपत्याखालून सुटका झाल्यावर उत्तर अमेरिकेतील लोकांनी 1000 हून अधिक भाषांमध्ये पवित्र शास्त्राचा अनुवाद केला आणि बफ्रयाचशा राष्ट्रांमध्ये संप्रदायांची स्थापना केली, याचे अनेक परिणाम झाले:

- त्यांनी अनेक स्वयंपूर्ण, सुवार्तावादी मिशनरी संस्था सुरू केल्या.
- अनेक देशांमधील राष्ट्रीय मंडळया स्वयंपूर्ण, देशी आणि सुवार्तावादी झाल्या, त्या त्यांचे स्वत: चे मिशनरी सेवेसाठी पाठवू लागले.
- चीनमधील गृहमंडळ्यांची चळवळ अधिकाऱ्यांकडून छळं होत असतांनाही वेगाने सर्वदूर पसरली.
- सुवार्तावादी ख्रिस्ती धर्म ही आज जगातील अत्यंत वेगाने वाढणारी धार्मिक चळवळ आहे.
- चीन, दक्षिण आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका व इंडोनेशिया याठिकाणी बहुसंख्य ख्रिस्ती लोक राहतात.

## 21 व्या शतकाच्या आरंभी

अनेक राष्ट्रांमधील मंडळ्या आता सर्व उर्वरित दुर्लक्षित लोकगटांकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. याचे ख्रिस्ती धर्मावर बरेच परिणाम झाले:

- ख्रिस्ती धर्माला कसून विरोध होणाफ्रया बहुतेक ठिकाणी उस्फूर्त स्वयंपूर्ण ''मंडळी रोपणाच्या चळवळी'' सुरु झाल्या
- बहुसंख्य ख्रिस्ती लोकांनी त्यांच्या स्वत:च्या मातृभाषेत पवित्र शास्त्र वाचले.

- कित्येक विश्वासणारे मंडळीच्या जुन्या रुढी परंपरांमधुन मुक्त झाले आणि प्रीति प्रार्थना, सहभागिता, कृपा व सुवार्ता प्रसार याद्वारे येशूचे आज्ञापालन करू लागले.
- अनेक मंडळयांनी त्यांचे स्वत:चेच लोक धार्मिक पुढारी म्हणून निवडले.
- उपासक त्यांच्या स्वत:च्या संस्कृतीतील पद्धती व रिवाज वापरु लागले.

## 2. सहकाऱ्यांशी चर्चा करुन योणाऱ्या आठवडयाच्या कार्यक्रमांची योजना आखा

विश्वासणाऱ्यांकडे त्यांच्या स्वत:च्या मातृभाषेतील पवित्र शास्त्र आहे याची खात्री करुन घ्या, एखादयाकडे नसेल तर त्यांना ते विकत घेता यावे याकरीता उपलब्ध करुन द्या.

कोणा विश्वासणाऱ्यांना वाचता येत नसेल तर त्यांना त्यांचे पवित्र शास्त्र वाचण्यास शिकता येईल अशी योजना आखा.

येशूचे मुक्तपणे आज्ञापालन करण्यास आणि इतरांना असेच करण्यास मदत करण्यापासून विश्वासणाऱ्यांना अडखळण ठरणाऱ्या मंडळीतील परंपरांबद्दल एकत्रित चर्चा करा. अशा प्रकारच्या अनेक रुढी परंपरा इतर संस्कृतीं मधुन येतात.

तुमची मंडळी कदाचित बाहेरुन मिळणाऱ्या देणग्यांवर अवलंबून असेल तर एकत्रितपणे चर्चा करुन तिला स्वयंपूर्ण करण्यासाठी योजना आखा. आपल्या गरजांसाठी देवावर अवलंबून राहणाऱ्यांना तो आशीर्वाद देतो.

तुमच्या जवळपास पुरेसे ख्रिस्ती लोक आणि मंडळया न सणारे लोकगट

असतील तर तुमच्या मंडळी तील काही सभासद मिशनरी म्हणून त्यांना मदत करण्यास जावेत यासाठी प्रार्थना करुन योजना आखा.

सुवार्ता प्रसाराच्या कार्यात सहकार्य मिळवे यासाठी तुम्ही ज्या मंडळयांच्या पाळकांना प्रशिक्षण देत आहात त्या इतर मंडळ्यांना **साहाय्य करा.**

## 3. सहकाऱ्यांशी चर्चा करुन येणाऱ्या उपासना सभेविषयी योजना आखा.

सुवार्ता प्रसार कसा होतो याविषयीचे शास्त्रभाग (भाग 1 मधील विश्वासणाऱ्यांनी वाचून त्यावर चर्चा करावी.

ख्रिस्ती धर्माच्या इतिहासातील अखेरच्या 400 वर्षाच्या काळात विश्वासणाऱ्यांनी सुवार्ता प्रसार कसा केला ते सांगा.

मिशनरी सेवा करणाफ्रयां विश्वासणाऱ्यांनी देवाने काय कार्य केले त्याविषयीची **साक्ष द्यावी**

विश्वासणाऱ्यांना देवाने गृह गटांमध्ये आणि गट सभांमध्ये कशा प्रकारे सहाय्य केले याची त्यांना साक्ष देण्यास सांगा, मुलांनी तयारी केलेली नाटिका त्यांना सादर करायला सांगा प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी प्रे. कृ. 20:7 हे वचन वाचा अगदी आरंभापासून बहुसंख्या विश्वासणाऱ्यांनी नियमितपणे **प्रभुभोजनाचा विधी** चालवण्यासाठी आरंभीच्या मंडळींचा आदर्श समोर ठेवला आहे.

दोघा वा तिघांचे लहान गट करून त्यांना योजना आखुन, एकमेकांसाठी प्रार्थना करुन प्रोत्साहन देण्यास सांगा.

**एकत्रित पाठ करा** मार्क 4:31-32 येशू देवाच्या राज्याचे वर्णन करुन सांगत होता हे प्रथम स्पष्ट करुन सांगा.

Copyright 2005 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net